# आरोग्य सेवा संचालनालय

**(महाराष्ट्र राज्य)**

**"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४००००१**

| | | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६<br>२२६२०२९२ | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com |
| | | क्र:संआसे/कक्ष-६/निपा व्हायरस/मार्गदर्शक सुचना/२७८-९९ /२०१८<br>दिनांक : २२ मे, २०१८ |


प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जि प आरोग्य विभाग, ....... (सर्व )

जिल्हा शल्य चिकित्सक , जिल्हा रुग्णालय , ...... (सर्व)

विषय – केरळ मधील निपा विषाणू आजाराच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर आवश्यकती खबरदारी घेणेबाबत

संदर्भ – १) कोझिकोडे केरळ येथील निपा विषाणू आजार उद्रेकाच्या बातम्या

२) डॉ प्रदीप खासनोबिस, प्रमुख एकात्मिक रोग सर्वेक्षण , नवी दिल्ली यांच्याशी दूरध्वनीवर झालेली चर्चा दिनांक २१ मे २०१८

३) राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेतील शास्त्रज्ञाशी झालेली चर्चा दिनांक २२ मे २०१८

वरील संदर्भिय विषयानुसार, कोझिकोडे केरळ येथे निपा विषाणू आजाराचा उद्रेक झालेला असून आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू या आजाराने झाल्याचे वृत्त आहे. एन सी डी सी , नवी दिल्ली आणि एन आय व्ही पुणे येथील तज्ञ पथक केरळला रवाना झाले आहे. आज रोजी या आजाराचा आपल्या राज्याला फारसा धोका नसला तरी या पार्श्वभूमीवर आपण महाराष्ट्रातही खबरदारी घेणे आवश्यक असून निपा सदृश्य आजाराचे सर्वेक्षण सर्व स्तरावर होणे तसेच प्रतिबंधात्मक आणि नियंत्रणात्मक उपाययोजना आखणे गरजेचे आहे.

निपा विषाणू (Nipah Virus) सर्वप्रथम १९९८ मध्ये मलेशिया मध्ये आढळला. भारतात सिलिगुडी ( २००१) आणि नाडिया ( २००७) या प. बंगाल मधील भागात या विषाणूचा उद्रेक यापूर्वी झाला होता. बांगला देशात या आजाराचे उद्रेक दरवर्षी दिसून येतात.

**निपा विषाणूचा प्रसार** -

या विषाणूचा प्रसार हा मुख्यत्वे फळांवर जगणा-या वटवाघळांच्या (Fruit bats) मार्फत होतो. वटवाघळांनी अर्धवट खाल्लेली फळे हाताळल्याने अथवा खाल्याने हा आजार होतो. डुक्कर

आणि इतर पाळीव प्राणी यांना देखील याची बाधा होऊ शकते. १९९८ च्या मलेशियातील उद्रेकात वराह पालन करणारे शेतकरी मुख्यत्वे बाधित झाले होते.

निपा विषाणूची लागण माणसापासून माणसास होऊ शकते. रुग्णांवर उपचार करणारे वैद्यकीय कर्मचारी, रुग्णसेवा करणारे नातेवाईक यांना लागण होऊ शकते. वटवाघळाच्या स्त्रावामुळे दूषित झालेला खजूराच्या झाडाचा रस पिल्याने देखील या विषाणूचा प्रसार होतो.

**अधिशयन कालावधी** – ५ ते १४ दिवस

**लक्षणे** – निपा विषाणू आजारात ताप, अंगदुखी, डोकेदुखी, झोपाळूपणा, मानसिक गोंधळ उडणे, बेशुध्द पडणे अशी लक्षणे आढळतात. आजवरील उद्रेकात मृत्यूचे प्रमाण ४० ते ७० टक्के एवढे आहे.

**उपचार**

निपा विषाणू आजारावर कोणतेही विशिष्ट औषध नाही. रॅबाविरिन हे विषाणू विरोधी औषध वापरले जात असले तरी मुख्यत्वे लक्षणाधारित उपचार आणि साहयभूत शुश्रूषा (Supportive Care) यावर भर दिला जातो.

**निदान**

निपा विषाणूच्या निदानासाठी आर टी पी सी आर (RT- PCR) पध्दतीने घसा/ नाक स्त्राव, मूत्र, रक्त या नमुन्यांची तपासणी राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्था, पुणे येथे करण्यात येते.

**सर्वेक्षण**

निपा विषाणू आजाराच्या या पार्श्वभूमीवर आपण आपल्या राज्यात सावध राहून सर्वेक्षण करण्याची आवश्यकता आहे.

**संशयित निपा रुग्ण** –

ताप, डोकेदुखी , झोपाळलेपण , मानसिक गोंधळ उडणे, शुध्द हरपणे अशी लक्षणे असणारा कोणताही रुग्ण आणि रुग्ण जपानी मेंदूज्वर अथवा इतर मेंदूज्वरा करिता निगेटिव्ह असणे आणि मागील ३ आठवडयात केरळ मधील कोझिकोडे परिसरात, ईशान्य भारतात अथवा बांगला देश सीमेलगतच्या भागात प्रवासाचा इतिहास असणे.

अशा वर्णनाचा कोणत्याही रुग्णास संशयित निपा विषाणू रुग्ण म्हणून गृहित धरावे. असा रुग्ण आढळल्यास या रुग्णास विलगीकरण कक्षात भरती करावे. त्याचा नमुना एन आय व्ही पुणे येथे पाठविण्यात यावा.

**प्रतिबंधात्मक खबरदारी** –

- डॉक्टर आणि इतर आरोग्य कर्मचा-यांनी रुग्ण उपचार आणि शुश्रुषा करताना जागतिक आरोग्य संघटनेच्या Universal Precautions नुसार आवश्यक खबरदारी घ्यावी.
- शेतात, जंगलात अथवा इतरत्र पडलेली फळे खाणे टाळावे.

आपल्या माहितीस्तव सोबत सी डी सी अटलांटा या संस्थेचे निपा आजारासंबंधीचे माहिती पत्रक जोडले आहे. आपण सर्वांनी या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाशीही आपापल्या स्तरावर समन्वय साधावा.

या संदर्भात भारत सरकारकडून मिळणा-या सूचना आपणांस वेळोवेळी कळविण्यात येतील.

संचालक आरोग्य सेवा,
मुंबई 22/5/2018

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव –
उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ ,...... (सर्व)
सहसंचालक आरोग्य सेवा ( हि. ह. व जरो), पुणे.
लक्षवेध – डॉ.प्रदीप आवटे, वैद्यकीय अधिकारी (साथरोग) सहसंचालक आरोग्य सेवा (हिहज) कार्यालय पुणे

२/- त्यांनी या संदर्भात वेळोवेळी पर्यवेक्षण करावे व आढावा घेऊन तसे संचालनालयास व शासनास अवगत करावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, कॉम्प्लेक्स बिल्डिंग, १० वा मजला, गो. ते. रुग्णालय, मुंबई
मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,